# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

### दिनांक ०५/०२/२०२५ (बुधवार)संध्याकाळ

---

## लोहा चोरी करणारा आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन कुही :— दिनांक २१.०१.२०२५ रोजी फिर्यादी जिवन सुरेश वाघ वय ३५ वर्ष रा प्लॉट न ४३ ओंम सदगुरु नगर नरसाळा नागपूर यांनी पोलीस स्टेशन कुही येथे रिपोर्ट दिली की, फिर्यादी चे घराचे बांधकाम हुडेकश्वर रोड वरील मौजा धामना शिवार येथे प्लॉट न ३५ येथे सुरु असून बांधकाम तेथील अडीच टन लोहा किंमत ६२०००/— रूपये दिनांक २०.०१.२०२५ चे रात्री १२.००वा ते २१.०१.२०२५ चे ०५.००वा चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कुही येथे कलम ३०३**(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.**

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा चे पथक सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत आरोपीचा शोध घेत असातांना दि ३०.०१.२०२५ रोजी गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक माहिती वरून कमाल चौक नागपुर येथुन आरोपी देवकुमार कुशवाह याला अटक केली होती. **आज दिनांक ०५/०२/२०२५ रोजी गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक माहिती वरून आरोपी देवकुमार कुशवाह चा साथीदार आरोपी नामे किसन मटुक पाली वय ४२ वर्षे,रा ठक्कर ग्राम ,पाच पावली ,नागपुर यास कमाल चौक नागपुर येथुन ताब्यात घेतले असुन कुही पोलीसांनी आरोपीस अटक केले आहे.**